# कंत्राटी पदभरती जाहिरात

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जिल्हा आरोग्य सातारा

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा यांची मंजुर टिपणी दिनांक26/१२/२०२५
कंत्राटी रिक्त पदे संवर्गनिहाय भरावयाची आहेत.

जाहिरात दिनांक 29/१२/२०२५

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>पदाचे नाव</th><th>वय</th><th>शैक्षणिक अर्हता</th><th>रिक्त पदे</th><th>संवर्ग</th><th>एकत्रित मानधन</th></tr>
<tr><td>०१</td><td>Hospital Manager</td><td rowspan="5">राखीव ४३ (NHM कार्यरत कर्मचारी ५ वर्षे शिथिल)</td><td rowspan="5">Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health</td><td>०१</td><td rowspan="4">अ.ज (ST)-०१<br>भ.ज.ब (NTB)-०१<br>इडब्युएस (EWS)-०१<br>खुला (Open)-०१</td><td rowspan="4">३५०००/-</td></tr>
<tr><td>०२</td><td>District QA Coordinator</td><td>०१</td></tr>
<tr><td>०३</td><td>District Epidemiologists</td><td>०१</td></tr>
<tr><td>०४</td><td>District Programme Coordinator-NPCDCS</td><td>०१</td></tr>
<tr><td>०५</td><td>District Programme Manager</td><td>०१</td><td>एसईबीसी (SEBC) -०१</td><td>३५०००/-</td></tr>
<tr><td>०६</td><td>Psychiatric Nurse</td><td>राखीव ४३ (NHM कार्यरत कर्मचारी ५ वर्षे शिथिल)</td><td>Diploma in Psychiatric Nursing or M.Sc. in Psychatry or B.Sc. Nursing with experience of working in department of psychiatry in govt set-up</td><td>०१</td><td>खुला (Open)-०१</td><td>२५०००/-</td></tr>
<tr><td>०७</td><td>आशा गटप्रवर्तक (महिला)</td><td>राखीव ४३ (NHM कार्यरत कर्मचारी ५ वर्षे शिथिल)</td><td>Any Graduate Typing Marathi ३० & English ४० Experience Working with Word or Excel is Preferred</td><td>०१</td><td>खुला (Open) -०१</td><td>८७७५/-</td></tr>
</table>

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती ११ महिने २९ दिवसाकरीता असेल.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच

अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) **जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत व नियुक्ती ठिकाणात बदल होऊ शकतो याबाबतचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सातारा यांनी राखुन ठेवले आहेत. पदसंख्येत बदल झालेस त्याबाबत उमेदवारांना आक्षेप घेता येणार नाही.**

६) सदर भरती प्रक्रियेमध्ये कोणतेही आक्षेप असलेस यांचे निवारण करणेचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांना राहतील.

७) अर्जदाराला कंत्राटी कालावधीमध्ये सोयीनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही. भविष्यामध्ये बदली नाही याची नोंद घ्यावी.

८) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करणे /अटींमध्ये बदल करणे याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखिव ठेवण्यात आलेले आहेत, याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

९) उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत सत्यप्रतींसह राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जि.प.सातारा येथे समक्ष **दिनांक २९/१२/२०२५ ते दिनांक १६/०१/२०२६** रोजी सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत कार्यालयीन दिवशी उपस्थित राहून सादर करावा. अथवा रजिस्टर/ स्पीड पोष्टने अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा कोणत्याही परिस्थीतीमध्ये विचार करणेत येणार नाही.

१०) उमेदवारांना भरतीप्रक्रियेसाठी प्रवासभत्ता अथवा इतर कोणताही भत्ता देय राहणार नाही.

११) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झालेनंतर भविष्यात जर एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस नविन भरती प्रक्रिया न राबविता नियमानुसार प्रतिक्षा यादीमधील गुणानुक्रमे पुढील उमेदवारांस नियुक्ती आदेश दिले जातील. सदर निवड यादी ही तयार झालेनंतर पुढील एक वर्षापर्यंत वैध राहील.

१२) खुला (सर्वसाधारण), इ.मा.व, ईडब्ल्युएस, भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड, वि.जा.अ., वि.मा.प्र., एस.ई.बी.सी.प्रवर्गातील उमेदवारांना रु.१५०/- व अ.जा. , अ.ज. प्रवर्गातील उमेदवारांना रु.१००/- भरती प्रक्रिया शुल्क राहिल. सदरची रक्कम खालील नमुद खात्यावर ऑनलाईन जमा करावयाची आहे. अर्ज

सादर करताना सोबत ऑनलाईन जमा केलेल्या पावतीची प्रिंट या कार्यालयास सादर करावी. **तसेच उमेदवारांनी आपल्या मुळ प्रवर्गातुन अर्ज करावा. जेणेकरुन भविष्यात रिक्त होणाऱ्या संबंधित प्रवर्गातुन गुणवत्ता यादीनुसार उमेदवारांस नियुक्ती देणेत येईल.**

**Account name- "District Integrated Society for Health & Family Welfare Program Satara"**

**Bank Name- Bank of Maharashtra**

**Account No- 60402928399**

**IFSC Code- MAHB0000305**

**Branch -Ch. Shivaji Circle, Powai Naka, Satara**

१३) सोबत अर्जाचा विहित नमुना जोडलेला आहे. अर्जाची छाननी करुन उमेदवारांची पात्र/अपात्र यादी, मेरिट यादी इ.बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी सातारा जिल्हा परिषदेच्या वेबसाईट www.zpsatara.gov.in वर प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत पुनश्च वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दीपत्रक दिले जाणार नाही किंवा वैयक्तिक स्वरुपात कोणालाही माहिती दिली जाणार नाही. त्यामुळे वैयक्तिक स्वरुपात माहिती दिली नाही म्हणुन कोणत्याही उमेदवारांस आक्षेप घेता येणार नाही. कोणत्याही उमेदवाराने जिल्हा कार्यालयास प्रत्यक्ष संपर्क साधु नये.

२९) रिक्त पदासाठी आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध नसलेस इतर उमेदवारांस गुणानुक्रमे (Against Reservation) तात्पुरत्या स्वरुपात मुळ संवर्गाचा उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा ११ महिने २९ दिवस या पेक्षा जे कमी असेल त्या कालावधीकरीता नियमानुसार नियुक्ती दिली जाईल.

३०) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी जिल्हा परिषद सातारा संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

३१) निवड यादीतील गुणाक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

३२) जाहीरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा अराखिव प्रवर्गासाठी ३८ वर्षे व राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील. तसेच एनएचएम अंतर्गत काम केलेल्या उमेदवारांना ५ वर्षे वयोमर्यादा शिथील राहील.

३३) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार छाननी करुन **गुणानुक्रमे** यादी तयार करण्यात येवुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

३४) केवळ शासकीय, निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणाऱ्या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

३५) उपरोक्त पदांपैकी तांत्रिक पदांकरीता तत्सम कौन्सिलचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील, अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविणेत येईल.

३६) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेस्तरावर राखिव ठेवण्यात आलेले आहेत, याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

३७) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची छाननी करुन खालीलप्रमाणे गुण देवून निवड करण्यात येईल. निवड समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहील. **सदर पदांसाठी मुलाखत घेतली जाणार नाही. सदर पदासाठी केवळ बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची गरज पडल्यास कौशल्य चाचणी (Skill Test) घेतली जाईल. कौशल्य चाचणीमध्ये अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.**

३८) सदर भरती प्रक्रिये करीता अर्ज दि.१६/०१ /२०२५ पर्यंत ऑफलाईन पद्धतीने स्वीकारले जातील तदनंतर अर्जाची छाननी, निवड यादी प्रसिध्द करणे, हरकती/आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्या निकाली काढणे इत्यादी रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान कडील प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार भरती प्रक्रिया पार पाडुन उमेदवारांची पात्र/अपात्र यादी, सर्व सुचना, गुणवत्ता यादी इ.बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी सातारा जिल्हा परिषदेच्या वेबसाईटर www.zpsatara.gov.in प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. उमेदवारांना प्रत्यक्ष संपर्क केला जाणार नाही व याबाबत पुन्हा वर्तमानपत्रामध्ये जाहीरात दिली जाणार नाही. पदाची प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल व भविष्यात सदर पदाच्या समकक्ष शैक्षणिक अर्हतेनुसार जिल्हयातील पद रिक्त झाले तर प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचा सदर पदासाठी विचार करण्यात यईल.

३९) सर्व पदांसाठी उमेदवारांनी सर्व शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे तसेच पदवीचे सर्व गुणपत्रक (पहिले वर्ष ते अंतिम वर्ष), पदवी प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, वय व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा पुरावा म्हणुन ( १० व १२ वीचे प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला) ही सर्व कागदपत्रे अर्जासोबत झेरॉक्स प्रतीत (साक्षांकित/स्वसाक्षांकित) जोडावीत. नावात बदल असल्यसा राजपत्र, विवाह नोंदणी जोडणे बंधनकारक राहील.

४०) अर्जदाराने यापुर्वी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत काम केले असल्यास पंरतू त्याच्यांवर प्रशासकीय कारवाई करुन त्यांना कामावरुन कमी केले असल्यास अशा उमेदवारांना या कार्यालयात अर्ज करता येणार नाही.

४१) **उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदाचे नाव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावा.**

४२) राखीव प्रवर्गातील उमेदवारानी अर्ज आरक्षणामधुन सादर करावयाचा असल्यास, अर्जासोबत जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य राहिल.

४३) अर्जदारांनी एका पेक्षा जास्त पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र धनाकर्ष असणे आवश्यक आहे.

पात्र उमेदवारांना पुढील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे गुण देण्यात येणार आहेत.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक (Qualifying Exam) मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणाच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे प्रॅप्रोशन काढावे.(उदा. ६० टक्के गुण प्राप्त असल्यास त्याचे ५० प्रमाणे Proportion =६०*५०/१००=३०) | ५० गुण |
| पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घेतली जाईल.) | अधिकतम २० गुण दयावेत. (उदा. कार्यक्रम सहाय्यक (स्टॅटिक्स) पदासाठी मुळ शैक्षणिक अर्हतेसह Post Graduate उमेदवाराने अर्ज केला असल्यास त्यास २० गुण दिले जातील.) | २० गुण |
| शासकीय व निमशासकीय अनुभव असल्यास (किमान अनुभव ०६ महिने) | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण दयावेत. (६ महिन्यांसाठी ०३ गुण) फक्त शासकीय संस्था विभाग शासन अंगीकृत संस्था यांचाच अनुभव ग्राहय धरणेत येईल. जास्तीत जास्त ०५ वर्षांपर्यंत | ३० गुण |

६. केवळ शासकीय,निमशासकीय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणाऱ्या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल. खाजगी, स्वयंसेवी संस्था, बाहय यंत्रणाद्वारे कार्यरत पदावर कामाचा अनुभवाचा विचार करणेत येणार नाही. समकक्ष कामाचा अनुभव ग्राहय धरणेत येईल. तसेच अनुभव प्रमाणपत्र सादर करताना संस्थेचे लेटर हेड, जावक क्रं व अनुभव कालावधीचा स्वयंस्पष्ट उल्लेख करणे गरजेचे आहे, नसल्यास अनुभव प्रमाणपत्र ग्राहय धरणेत येणार नाही. नियुक्तीच्या आदेशाच्या आधारे गुण दिले जाणार नाहीत.

७. ज्या उमेदवारांना ग्रेड सिस्टीम/CGPA नुसार गुण मिळालेले आहेत त्यांनी अंतिम वर्षाच्या गुणांची टक्केवारी तसेच त्यांच्या विदयापीठानुसार टक्केवारी काढण्याचे सुत्र अर्जामध्ये नमुद करावेत. सदर माहिती न दिल्यास गुण दिले जाणार नाहीत.

८. वरीलप्रमाणे गुणांकन केल्यावर गुणानुक्रमांनुसार अधिकतम गुण मिळालेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. सदर यादीबाबत आक्षेप असल्यास ते सादर करण्याकरीता विहित मुदत देणेत येईल. आक्षेपसोबत त्यांच्या पृष्टयर्थ योग्य पुरावे सादर करण्यास सुचित करणेस येईल. अशा प्रकारे प्राप्त आक्षेपांचे निराकरण करुन त्यानुसार अंतिम गुणवता यादी तयार करणेत येईल व ती जिल्हा परिषद, सातारा या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येईल, व त्यानुसार नियुक्ती आदेश देण्यात येतील.

९. नियुक्ती आदेश देण्यापुर्वी सर्व मूळ (original) आवश्यक प्रमाणपत्रे, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे इतर आवश्यक कागदपत्रे यांची तपासणी व खात्री करण्यात येईल. कागदपत्राची पुर्तता न केलेस कोणत्याही उमेदवाराचा अर्ज कोणत्याही स्तरावर बाद करणेत येईल व गुणांकनामध्ये ही बदल करणेत येईल.

१०. अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना पदस्थापना रुग्णसेवेच्या आवश्यकतेनुसार देण्यात येईल, याबाबत उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रदद करणेत येईल.

❖ खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या स्वसाक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती अर्जाच्या सोबत जोडाव्यात.

१) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व सर्व वर्षांच्या गुणपत्रिका

२) राखीव उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र

३) शाळा सोडल्याचा/जन्म तारखेचा दाखला

४) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र

५) पासपोर्ट आकाराचा फोटो

६) प्रमाणित केलेली शासकिय / निमशासकिय अनुभव प्रमाणपत्रे

७) नावात बदल असलेस त्यासंबंधिचा पुरावा (राजपत्र/विवाह नोंदणी प्रमाणपत्र)

८) संबंधित कौन्सिलचे Registration व Renewal Certificate

24/12/25

| सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |
|---|---|---|
| जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक | जिल्हा आरोग्य अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| एनएचएम, जि.प. सातारा | जिल्हा परिषद, सातारा | जिल्हा परिषद, सातारा |